नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३३ Issue - 33 | वार गुरुवार दि. १९ जून २०२५ Blow- Thursday Date 19 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ‘एमबी’वर सही करून देण्यासाठी पन्नास हजाराची केली मागणी

# ठरलेली टक्केवारी न दिल्याने काटकरानी केलं ‘एमबी’तील रक्कम कट


## पाणी पुरवठा विभागाची कामे म्हणजे ‘आंधळ दळतंय कुत्र पीठ खातंय’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट ( विशेष प्रतिनिधी )

**भाग - २**

अक्कलकोट तालुक्यातील पाणी पुरवठा विभाग मध्ये रोज अनेक नवं नवीन खिस्से पाहण्यास मिळत आहेत वागदरी जिल्हा परिषद गटातील गावामध्ये उप अभियंता यांच्या हाताखाली काम करण्यास काटकर म्हणून मॅडम असून काम कमी दाम जास्त असे पद्धत चालू आहे ग्रामपंचायत मधील सरपंच, उपसरपंच, ठेकेदार लोक प्रतिनीधी कामानिमित्त या कार्यालयास येत असतात काम झाल की मोज माप घेण्याच्या उद्देशाने सदर कर्मचारी गावात येतात ठेकेदार अगर सरपंच यांनी कामाचे ठरलेले टक्केवारी दिलं की काम कसं का होईना बील लिहून देतात टक्केवारी जेवढं जास्त तेवढं फास्ट बील थोड काही काम करण शिलक असेल तर प्रत्येकी दहा फुटासाठी पाच हजार रेट



ठरल्याचे बोले जात आहे. ठरलेले पैसे न दिल्यास लिहिलेले एम बी कुठलेतरी कारण लावून कमी करतात व नाईलाजाने काम निकृष्ट दर्जाचे होतात. ह्या अधिकाऱ्याची टक्केवारी वाढत जातात वागदरी जिल्हा परिषद गटात काटकर आल्यापासून किती कामे झाले आहेत. त्या सर्व कामाचे चौकशी उच्चस्तरीय समिती नेमणूक करून सदर कामाची एम बी प्रमाणे कामे झालेत का त्याची मोज माप किती आहे त्यात जर काही चुकीची आढळल्यास संबंधित अधिकारी काटकर व उपअभियंता राठोड यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कामात हलगर्जीपणा केल्याचे ठपका ठेवून त्वरित कार्यवाही करण्यात यावे सदर उपअभियंता राठोड याला जिल्हा बाहेर बदली करण्याचे मागणी अनेक सरपंच उपसरपंच यांच्यातून होत आहे.

> गोगांव येथील दलीत वस्ती मधील बंदिस्त गटार काम सन २३-२४ असून सदर कामाची मुदत मार्च २०२५ संपल्याने निधी परत गेले आहे सदर काही किरकोळ कामे बाकी असून सदर काटकर मॅडम सांगितल्या प्रमाणे उर्वरित काम सहा पाईप तीन चेबर काम चालू असून त्यावर व अजून थोड्या कामावर सिमेंट कॉंक्रिट करणे बाकी आहे ते काम करण्यासाठी खडी सिमेंट आलेले असून क्रासाईड आल्यावर काम करण्याचे हमी उप अभियंता राठोड व काटकर यांना सांगून एम बी लिहून झेरॉक्स देण्याचे विनंती केले व राहिलेले काम पूर्ण केल्याशिवाय बील देऊ नका असे मी स्वत: सांगितले त्यावेळी सदर काटकर यांनी मला राठोड साहेबाने वीस हजार मागितले असून माझे तीस हजार असे पन्नास हजार द्या व तुमचे एम बी लिहून ठेवले आहे ते घेऊन जावा असे पंधरा दिवसांपूर्वी सांगितले होते माझ्या कडे पन्नास हजार देण्यासाठी पैसे नसले नंतर देतो असे बोलो तेव्हा सदर काटकर यांनी लिहिलेल्या एम बी पेक्षा एक लाख चौदाहजार कमी केले सदर टायपिंग केलेले बील बघून राहिलेले काम पूर्ण झाल्यानंतर बील घेतो असे सांगून आलो याठिकाणी जेवढं टक्केवारी जास्त तेवढं काम न बघता बील देण्याची प्रथा चालू आहे. कार्यकारी अभियंता यांना मी काटकर व राठोड यांना त्वरित बदली करून कार्यवाही करण्याची मागणी करीत आहे.
>
> – शाम बाबर ( व्हेंडर)




काटकर यांनी एम बी देण्यासाठी मंजूर निधीच्या पाच टक्के ते दहा टक्के रक्कम मागणी करत असल्याचे त्या भागातील सरपंच व व्हेडर यांचे म्हणे आहे पहिल्यांदा काम पाहणी करून मोजमाप घेऊन जा-तात आणि ऑफिसला बोलावून टक्केवारी बाबत बोलणी होतो त्यात योग्य ठरलं नाहीतर उणिवा चुका काढण्यास सुरुवात होतो नंतर कंटाळून शेवटी जे ठरलंय ते काम केलेल्या ठेकेदार यांनी देऊन बील घेऊन जा-तात.

---

वयाच्या ९३ वर्षी घेतला अखेरचा श्वास

# पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वयाच्या ९३ वर्षी अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांनी अखेरचा श्वास घेतला. ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यानंतर दिल्लीतून परतल्यापासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती. ते आजारी आणि अंथरुणातचं होते. अखेर, आज संध्याकाळी ७ च्या सुमारास सोलापुरातील राहत्या घरी त्यांचे निधन झाले.

मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. त्यांनी एकूण ५ लाख किमी प्रवास केला. मारुती चितमपल्ली यांना १३ भाषांचे ज्ञान होते. त्याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत त्यांनी पर्यावरणाशी संबंधित मोठी माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या आणि ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत. डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षीकोश, प्राणीकोश आणि मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केलं.

अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी २५ पेक्षा जास्त पुस्तके चितमपल्ली यांनी लिहिली. निसर्गातील हा ठेवा समाजाला कळावा या भावनेतून सतत कार्यरत हा सकारात्मक विचाराचा ऊर्जाकोश म्हणजे विख्यात लेखक मारुती चितमपल्ली. मराठी साहित्यामध्ये निसर्ग चित्रणाची वाट मारुती चितनपल्ली यांनी निर्माण केली आणि त्यांचे संबंध लेखक वाचत असताना आपण रानातून वनातून जंगलातून फिरतो, पशुपक्षी प्राणी आपल्याशी संवाद साधतात असा आपल्याला भास होत होता. अतिशय ललितरण्य अशी त्यांची शैली होती. म्हणजे अभ्यास आणि व्यासंगाला शैलीची जोड देऊन त्यांनी जे काही लेखन केलं. त्यामुळे मराठीमध्ये एक वेगळी हिरवी वाट त्यांच्या लेखन आणि निर्माण झाली.

# पुण्यातील जेजुरीजवळ स्विफ्ट कारचा भीषण अपघात, सात जण जागीच ठार, ५ गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : जिल्ह्यातील जेजुरी-मोरगाव रस्त्यावर स्विफ्ट कार आणि पीकअप टेम्पोच्या भीषण अपघाताची (ललळवशर्पी) घटना घडली. या दुर्दैवी अपघातात एका महिलेसह ७ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जेजुरी मोरगाव रस्त्यावरील एका कंपनी समोर रात्री सव्वा ७ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. अपघाताच्या घटनेनंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली असून पोलिसांनाही पाचारण करण्यात आलं आहे. दरम्यान, अपघात एवढा भीषण होता की ७ जण ठार झाले असून ५ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

याबाबत घटना स्थळावरुन मिळालेली माहिती अशी की,



पुण्याहून मोरगावकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार (क्र. एम एच ४२ ए एक्स १०६०) जेजुरीकडून मोरगावकडे जात असताना श्रीराम ढाब्यासमोर पिकअप टेम्पोला ( क्र. एम एच १२ एक्स एम ३६९४ ) मधील साहित्य खाली करीत असताना जोरदार धडक दिली. येथील रस्त्यावरील एका कंपनी समोरील हॉटेल श्रीराममध्ये पीकअप टेम्पोमधील साहित्य उतरविण्याचे काम सुरू होते. त्यावेळी जेजुरीकडून इंदापूरकडे जाणाऱ्या कारने पीकअप टेम्पोला जोरदार धडक दिली. या अपघातात स्विफ्ट कारमधील पाच जण तर पिकअपमध्ये असलेल्या दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, अपघातामध्ये कारचा चेंदामेंदा झाल्याचे पाहायला मिळत असून त्यावरुन, भीषण अपघाताची दाहकता लक्षात येईल.

सोमनाथ रामचंद्र बायसे (२१), रामू संजीवन यादव, दोघेही रा नाझरेकप ता.पुरंदर जि.पुणे, अजयकुमार चव्हाण, रा. उत्तर प्रदेश, अजित अशोक जाधव, रा.कांजळे, ता. भोर, पुणे, किरण भारत राऊत रा. पवारबाकी ता. इंदापूर, पुणे, अश्विनी संतोष येसार, रा. नागणसूर हैद्रे सोलापूर, अक्षय शंकर राऊत, रा. झारगडवाडी ता. बारामती, पुणे अशी अपघातील मृतांची नावे आहेत. दरम्यान, घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली असून मृतांचे पार्थिक शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.




# मराठी भाषा अनिवार्य; हिंदीसह इतर भारतीय भाषा ऐच्छिक : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

मुंबई : राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, हिंदी ऐवजी इतर भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्यास इच्छा दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या शाळेतील इयत्तानिहाय संख्या ही किमान २० इतकी असणे आवश्यक राहील. हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता उपरोक्तप्रमाणे विहित किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, त्या भाषेच्या अध्यापनाकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल अन्यथा सदर भाषा ही ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात येईल.

सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल. ज्या शाळा मराठी भाषा शिकविणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. यासंबंधीचे सर्व नियोजन हे शालेय शिक्षण आयुक्त यांच्यास्तरावरून तत्काळ करण्यात येईल. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता सहावी ते दहावीकरिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण प्रमाणे असेल, असेही मंत्री श्री.भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषेबाबतच्या १६ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयामध्ये वरीलप्रमाणे बदल करण्यात आला असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

## संपादकीय....

### भाषेवरून वादंग

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेए-ेवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, हिंदी ऐवजी इतर भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्यास इच्छा दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या शाळेतील इयत्तानिहाय संख्या ही किमान २० इतकी असणे आवश्यक राहील. हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता उपरोक्तप्रमाणे विहित किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, त्या भाषेच्या अध्यापनाकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल अन्यथा सदर भाषा ही ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात येईल. सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल. ज्या शाळा मराठी भाषा शिकविणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. यासंबंधीचे सर्व नियोजन हे शालेय शिक्षण आयुक्त यांच्यास्तरावरून तत्काळ करण्यात येईल. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता सहावी ते दहावीकरिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण प्रमाणे असेल, असेही मंत्री भुसे यांनी नुकतेच स्पष्ट केले आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषेबाबतच्या १६ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयामध्ये वरीलप्रमाणे बदल करण्यात आला असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

# स्वस्त धान्य दुकानदारांचे थकीत कमिशन देण्याची कार्यवाही करावी : मंत्री छगन भुजबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे मागील थकीत कमिशन अदा करण्याची कार्यवाही करावी. केंद्राचा निधी प्राप्त झाल्यानंतर राज्याला द्यावयाचा हिस्सा तातडीने देवून कमीशन अदा करावे, असे निर्देश अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिले आहेत.



मंत्रालयात नागपूर व रत्नागिरी जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या मागण्यांबाबत आयोजित बैठकीत मंत्री भुजबळ बोलत होते. बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रधान सचिव विनीता वेद सिंघल, रत्नागिरी जिल्हा बैठकीस आमदार शेखर निकम, नागपूर स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष बाबा आष्टणकर उपस्थित होते. रत्नागिरी बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे अध्यक्ष श्री. कदम, जिल्हा पुरवठा अधिकारी उपस्थित होते.

मंत्री भुजबळ म्हणाले, केंद्र सरकारशी संबंधित विषयांबाबत विभागाने सर्वंकष माहिती तयार करावी.

यासंदर्भात लवकरच दिल्ली येथे केंद्रीय अन्न नागरी पुरवठा मंत्र्यांसमवेत बैठक घेण्यात येईल. रेशनकार्ड शोध मोहीम राबविण्यात यावी. या मोहिमेत अपात्र ठरलेल्या शिधापत्रिकाधारकांचे धान्य वितरण बंद झाल्यास धान्याचा कोटा वढविणे शक्य होईल. धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल कमिशन वाढ करण्याचा प्रस्ताव तयार करावा, अशा सूचनाही मंत्री भुजबळ यांनी दिल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, स्वस्त धान्य दुकानदारांना ओळखपत्र देण्यात यावे. याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांना प्राधिकृत करावे. तसेच ऑफलाईन धान्य वितरणाची परवानगी मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा.

# स्वच्छतागृहे तुम्ही स्वच्छ करता की आम्ही करू: शिवसेना युवा नेते विश्वजीत भोसले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दरवर्षीपणे याही वर्षी तीर्थक्षेत्र आषाढी यात्रेच्या निमित्ताने भाविकांची गर्दी वाढू लागलेली आहे. व भाविकांचा साठी आवश्यक असलेल्या सोलापूर जिल्हा प्रशासन तसेच पंढरपूर शहर व तालुका प्रशासन यांनी यात्रेत येणाऱ्या वारकरी व भाविक भक्तांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी नेहमीप्रमाणे करीत असतात. परंतु पंढरपूर यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या माता-भगिनींची संख्या मोठ्या प्रमाणात असते या माता-भगिनींसाठी पंढरपूरमध्ये प्रवेश केल्यानंतर कुठेही सुलभ स्वच्छतागृह उपलब्ध आहेत. अतिशय घाणीच्या साम्राज्याम ध्ये दिसून येत आहेत ती काही नवीन शौचालय बनवलेले आहेत ते अद्यापही बंद आहेत.

पंढरपूर शहरांमध्ये मुख्य रस्त्याने प्रवेश केल्या असतात एसटी स्टँड ते मंदिराकडे स्टेशन रोड मार्गे जाणारा रस्त्यावर कोठेही पण नगरपालिके एसटी स्टँड कडे जाणारा रस्त्याला सुद्धा कुठेही बाथरूम टॉयलेट नाही महिलांसाठी व पुरुषांसाठी सुलभ स्वच्छता तसेच बाथरूम टॉयलेटची सुविधा नाही प्रशासन आणि शिवसेनेच्या माध्यमातून गेले कित्येक दिवसापासून आम्ही मागणी करीत आहोत परंतु पंढरपूर नगरपालिका आरोग्य विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते महिलांसाठी आवश्यक असलेली सुलभ शौचालय ते त्वरित स्वच्छ केले जावेद व नवीन बांधून तयार असलेले सर्व शौचालय ही सुरू करण्यात यावी अशी प्रकारची मागणी पंढरपूर शिवसेना एकनाथ शिंदे गट या पक्षाचे वतीने शहर प्रमुख युवासेना व शुभजीत मुन्ना भोसले यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या सोबत पंढरपूर नगरपालिका मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

शिवसेना युवा नेते विश्वजीत उर्फ मुन्ना भोसले हे आपल्या मुलाखतीमध्ये बोलत असताना त्यांनी पंढरपूर नगरपालिका आरोग्य विभाग यांना स्पष्ट शब्दात सूचित केले आहे स्वच्छतेवर हे तुम्ही स्वच्छ करता का आम्ही स्वच्छ करू.

मुख्याधिकारी यांना निवेदन देते प्रसंगी युवा नेते विश्वजीत भोसले साईनाथ बडवे रोहित शिंदे अधिक कार्यकर्त्यांच्या समवेत असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेतमजुरीविषयक धोरण ठरविण्याबाबत शासन ठोस पावले उचलणार : मंत्री कोकाटे

मुंबई : शेतीतील उत्पादकता वाढावी तसेच शेतीचा उत्पादन खर्च कमी व्हावा यासाठी शेतीतील मजुरीविषयक धोरण ठरविण्याबाबत शासन ठोस पावले उचलणार आहे. कमी मनुष्यबळात काम करणे, मानवविरहित यंत्राचा वापर करणे, कृषी यांत्रिकीकरणासाठी शासन विविध कृषी यांत्रिकीकरणाच्या योजना राबवत आहे शासन शेतक-यांच्या हितासाठी आलेल्या सर्व सूचनांचा सकारात्मक विचार करून त्यावरती कार्यवाही करेल असे कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्यला आश्वासित केले. मंत्रालयात आयोजित शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नविषयक शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाच्या बैठकीत कृषी मंत्री ॲड. कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्तालय पुणेचे दूरदृश्यप्रणालीद्वारे कृषी आयुक्त सुरज मांढरे, संचालक रफिक नायकवडी, सुनिल बोरकर, विनयकुमार आवटे, डॉ. के. पी. मोते, शासकीय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाचे अध्यक्ष ड. प्रकाश पाटील, सदस्य बीडचे नाथराव कराड ,परभणीचे सदाशिव थोरात, कोल्हापूरचे सर्जेराव पाटील, साताराचे विश्वंभर बाबर, वाशिमचे रविंद्र गायकवाड, कर्जतचे पांडूरंग डोंगरे, साताराचे राजेद्र गायकवाड, ठाणेच बबन हरणे, नागपूरचे आत्मास्वामी खोपडे, जळगाव प्रविण पाटील-फरकांडे यासह इतर पुरस्कारप्राप्त शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते. कृषी मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, कृषी विषयक समित्यावर शासन निर्णय घेऊन कृषी पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना सदस्य म्हणून घेण्यात येईल. शेतीविषयक कामांसाठी योग्य ते धोरण ठरविण्यात येईल शासनाकडे याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करू, पीकविमा योजनेत सुधारणा करणे, कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्र यांना सक्षम करत आहोत.

# आरळी ( बु.) ग्रा.प.च्या उपसरपंचपदी भिमराव सोनवणे यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील आरळी (बु.) ग्राम पंचायतीच्य उपसरपंच पदी आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते भिमराव अर्जुन सोनवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

येथिल उपसरपंच संजय नागनाथ पाटील यानी स्वइच्छेने राजीनामा दिल्याने आरळी (बु.) ग्रा.प.चे उपसरपंच पद रिक्त झाले होते. या रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी दि.१८ जून रोजी निवडनुक घेण्यात आली. या निवडणूकीत भिमराव सोनवणे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवाडनुक निर्णय आधिकारी यानी भिमराव सोनवणे यांची उपसरपंच पदी बिन विरोध निवड झाल्याचे घोषिति केले.



यावेळी निवड निर्वाचन अधिकारी म्हणून पंचायत समिती तुळजापूरच्या कृषी विभागाचे विस्तार अधिकारी श्री.नडगे साहेब, ग्रामसेवक हमीद पठाण, तलाठी दयानंद काळे आदीनी काम पहिले.



भिमराव सोनवणे यांची उपसरपंच पदी निवड झाल्या बदल ग्रामस्तांच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी सरपंच किरण व्हटकर,संजय पाटील,गोविंद पारवे,मधुमालती पारवे, मनिषा तानवडे,ज्योती पोळे, अश्वीनी व्हटकर, छावा संघटनेचे जिल्हा अध्यक्ष महेश गवळे, पोलीस पाटील युवराज पाटील, संजय पारवे, प्रशांत उकरंडे, भास्कर पारने, संगाप्पा उकरंडे, ताणाजी पारवे, बाळू गवळी, अनिल जाधव, चंद्रशेखरउकरंडे सह ग्रामस्त उपस्थित होते.

# जिल्हा रिपाइंच्या सरचिटणीसपदी विष्णूदादा भोसले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा सरचिटणीसपदी विष्णूदादा भोसले यांची नियुक्ती करण्यात आली, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम यांनी त्यांना नियुक्ती पत्र दिले

यावेळी, रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशचे जेष्ठ नेते पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष रोहीदासबापू गायकवाड , महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या वरिष्ठ उपाध्यक्षा संगिताताई आठवले, पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेश डाळींबे, जिल्हा उपाध्यक्ष दशरथ गायकवाड गुरुजी, जिल्हा संघटक सचिव राजाभाऊ ओव्हाळ, जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते, विश्वनाथ जाधव, भारतीय बौध्दमहासभेचे प्रदेश उपाध्यक्ष भिमरावदादा कांबळे पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष बळीराम सोनवणे, भोर तालुका अध्यक्ष राहुल कांबळे, बारामती तालुका अध्यक्ष संजय वाघमारे पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे युवक अध्यक्ष स्वप्निल पाटोळे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पुरंदर तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, भोर तालुका युवक अध्यक्ष सुमित वर्वेकर मुळशी तालुका युवक अध्यक्ष राहुल कांबळे, मुळशी तालुका रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष विजय भालेराव, मुळशी तालुका सरचिटणीस मनिष गायकवाड यांसह विविध मान्यंवर यावेळी उपस्थित होते,




सासवड येथे रविवार दि १५ जून रोजी सासवड येथील गावकरी हॉटेल येथे पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम यांच्या अध्यक्षतेखाली पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी विष्णूदादा भोसले यांची कदम यांनी जिल्हा सरचिटणीस म्हणून नियुक्ती जाहीर करुन मान्यवरांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्र दिले,

विष्णूदादा भोसले यांनी यापूर्वी पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष, जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे उपाध्यक्ष पुणे जिल्हा रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम केले आहे. सध्या ते रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस म्हणून कार्यरत आहेत.

संजय गांधी निराधार तालुका समिती , व कोडीत ग्रामपंचायत सदस्य म्हणून देखील भोसले यांनी काम केले आहे. आंदोलन सम्राट म्हणून त्यांची पुणे जिल्ह्यात ओळख आहे, भोसले यांची पुणे जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हा अध्यक्ष श्रीकांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली , सोशीत वंचित घटकांच्या न्याय हक्कासाठी काम करु अशी प्रतिक्रिया नियुक्ती नंतर विष्णूदादा भोसले यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली,

## किरण आबिटकर यांना शिवाजी विद्यापीठाची पीएचडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : देवचंद कॉलेज अर्जुननगरच्या कु.किरण रेखा किशोर आबिटकर यांना शिवाजी विद्यापीठाची पीएचडी मिळाली असून त्यांच्या



संशोधनाचा विषय- (स्टडीएस ऑन फयटोकेमिकल इंग्रेडयंट्स अँड देयर इफेक्ट ऑन स्पोडोपटेरा लिटूरा अँड हेलीकव्हरपा आमजेरा ) असा आहे.

वेगवेगळ्या झाडांच्या पानाचा अर्क काढून त्याचे परीक्षण करून स्पोडोपटेरा लिटूरा अर्थात तंबाखू वरची अळी व हेलीकव्हरपा आर्मीजेरा म्हणजेच हरबऱ्यावरची बोन्ड अळी या दोन किडिंवर त्याचा काय प्रादुर्भाव होतो व त्यापैकी कोणता अर्क या किडीना रोखण्यासाठी उपयुक्ता आहे याचा अभ्यास केला आहे.

आपल्या संशोधन विषयी बोलताना किरण आबिटकर म्हणाल्या.. स्पोडोप्टेरा लिटुरा आणि हेलिकॉव्हरपा आर्मिगेरा हे जगभरातील सर्वात विनाशकारी कृषी कीटकांपैकी आहेत. ते आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांच्या विस्तृत श्रेणीवर हल्ला करतात, ज्यामुळे उत्पादनात लक्षणीय नुकसान होते आणि रासायनिक कीटकनाशकांचा व्यापक वापर होतो. वनस्पतीजन्य कीटकनाशकांना शाश्वत पिक संरक्षणासाठी स्वीकारार्ह, प्रभावी आणि विश्वासार्ह बनवतात. वनस्पतीजन्य कीटकनाशके पिकांवर आणि पर्यावरणात उरलेला अंश नसल्याने ती ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी उपयुक्त मानली जातात. या समस्येवर उपाय म्हणून सद्याचा अभ्यास निवडक वनस्पतींमधील द्वितीयक चयापचयी घटकांचे विश्लेषण करून स्पोडोप्टेरा लिटुरा आणि हेलिकॉव्हरपा आर्मिगेरा वर त्यांचे जैवप्रभावीपण (bioefficacy) तपासण्यासाठी केंद्रित आहे, जेणेकरून पर्यावरणीय धोके कमी करताना कीटक नियंत्रणात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या शाश्वत वनस्पती-आधारित कीटक व्यवस्थापन उपाययोजना विकसित करता येतील, असेही त्या म्हणाल्या. शोधप्रबंध मार्गदर्शक- प्रा. डॉ. पी. डी. शिरगावे. व्हायवा चेअरमन प्रा. डॉ. एस. आर. यंकांची. रेफरी डॉ पी एस मतिवडे असोसिएट डायरेक्टर (रिटायर्ड) एग्रीकल्चर युनिव्हर्सिटी धारवाड जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह आणि उपाध्यक्ष डॉ. तृप्तीभाभी शाह देवचंद कॉलेज चे प्राचार्य प्रा. डॉ. जी. डी. इंगळे. डॉ. टी. जी. नगराजा. यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांचे प्रोत्साहन लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यात सुमारे साडे अकरा लाख हेक्टरवर पेरण्या

## मोसमी पाऊस सर्वत्र सक्रिय, मंत्रिमंडळ बैठकीत आढावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विविध भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला असून आतापर्यंत सुमारे ११.७० लाख हेक्टर शेतजमीनीवर पेरण्या झाल्या आहेत, अशी माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

पाऊस चांगला झाला असल्याने खतांची मागणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या खतांची उपलब्धता करुन ठेवा. गरज भासल्यास आणखी मागणी करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील पीक पाणी, खते आणि बियाणे पुरवठा यांच्याबाबत कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, राज्यातील जवळपास सर्वच भागात मोसमी पाऊस सक्रिय झाला आहे. यंदा आतापर्यंत ११.७० लाख हेक्टरवर पेरण्या झाल्या आहेत. गेल्या वर्षी १४५.८२ लाख हेक्टरवर अंतिम पेरण्या झाल्या होत्या. त्या तुलनेत यंदा सरासरी आठ टक्के पेरण्या झाल्या आहेत.

खरीप हंगामातील पूर्वमशागतीची कामे सुरू आहेत. राज्यातील काही भागात सतत पाऊस सुरू असल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

अहिल्यानगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली आणि धाराशिव जिल्ह्यात शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस झाला आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा, कोल्हापूर, जालना आणि लातूर जिल्ह्यात ७५ ते १०० टक्के पाऊस झाला आहे. ठाणे, रायगड, नाशिक, नांदेड, परभणी, हिंगोली आणि बीड या जिल्ह्यात ५० ते ७५ टक्के पाऊस झाला आहे. पालघर बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात २५ ते ५० टक्के पाऊस झाला आहे. नंदुरबार, वर्धा, नागपूर, गोंदिया, भंडारा जिल्ह्यात २५ टक्के पेक्षा कमी पाऊस झाला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील भागात येत्या दोन ते चार दिवसांत चांगला पाऊस पडण्याची शक्यता आहे असे रस्तोगी यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील सर्व धरणाच्या जलाशयाच्या पाणीसाठ्यात चांगली वाढ होत आहे, असे जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले. कर्नाटकातील अलमट्टी धरण प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांच्याशी संपर्क साधला असून त्यांनी धरणात ५१५ मीटरपर्यंत पाणीसाठा करण्यात येईल, असे सांगितल्याची माहिती कपूर यांनी यावेळी दिली.

मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाची सोलापूर जिल्हा कार्यकारणी बरखास्त





### प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेने घेतला निर्णय; लवकरच नूतन कार्यकारणी होणार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरलप्रतिनिधी : सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या बळीराम काका साठे यांच्या रिक्त झालेल्या जिल्हाध्यक्षाच्या पदावर वसंतनाना दौलतराव देशमुख यांची निवड झाल्यानंतर पूर्वीची सोलापूर जिल्ह्यातील सर्व कार्यकारणी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेप्रमाणे बरखास्त करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचा बालेकिल्ला असून या जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची ताकद मोठ्या प्रमाणात पूर्वीपासूनच दिसून येते. सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी असलेले बळीराम काका साठे यांचे पदावरून पाय उतार झाल्यानंतर सोलापूर जिल्हाध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खंदे समर्थक व सुरुवातीपासून शरदचंद्र पवार यांच्यासोबत असलेले त्याचबरोबर विजयसिंह मोहिते पाटील व सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या नेत्यांशी सलोख्याचे संबंध असल्यामुळे वसंतनाना दौलतराव देशमुख यांची निवड सर्वानुमते करण्यात आली. या निवडीनंतर प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेप्रमाणे सोलापूर जिल्हा कार्यकारणी तसेच सर्व तालुका अध्यक्ष, शहराध्यक्ष कार्यकारणी बरखास्त करण्यात आली आहे.

नूतन सोलापूर जिल्हा अध्यक्ष वसंतनाना दौलतराव देशमुख हे वरिष्ठ नेत्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच नव्याने सोलापूर जिल्ह्यातील कार्यकारणी निवड करणार आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी तयारीला लागावे. त्याचबरोबर जास्तीत जास्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जागा निवडून आणण्याकरता प्रयत्नशील राहावे, यासाठी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचे संकेत मिळत आहे. नुकतेच सोलापूर जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याची पत्र जिल्हाध्यक्ष वसंतनाना दौलतराव देशमुख तसेच कार्याध्यक्ष रवींद्र (भाऊ) शहाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आले आहे.



# सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटक मा. शरदजी जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत व विभाग प्रमुख संतोषजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार भारती पंढरपूर जिल्हा कार्यकारिणी (२०२५-२०२७) ची अधिकृत घोषणा करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीत सहकारी साखर कारखाना जिल्हा प्रकोष्टपदी उमेश जी परिचारक यांची तर पंढरपूरातील ख्यातनाम प्रज्ञावंत व्यावसायिक उ राजेंद्र विलास बजाज यांची अध्यक्षपदी, शिवानंद बोरामणी यांची महामंत्रीपदी, तर ॲड. प्रशांत बिचुकले यांची संघटन प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नविन कार्यकारिणीत अनेक उत्साही व कार्यसमर्थ सहकारी कार्यकर्त्यांचा समावेश असून, सहकार क्षेत्रातील नवचैतन्याची सुरुवात झाली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सहकार गीताने झाली. दुग्ध प्रकोष्ठ प्रदेशप्रमुख उमेश विरधे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व परिचय करून दिला. त्यांनी सहकार भारतीचे संस्थापक श्रध्येय लक्ष्मणराव इनामदार व सहकार तपस्वी सुधाकरपंत परिचारक यांना अभिवादन करून सहकार भारती या संस्थेच्या १९८८ पासूनच्या वाटचालीचे अवलोकन उपस्थितांना दिले.

मा. शरदजी जाधव यांनी सहकाराच्या वाढत्या भूमिका, केंद्रीय सहकार मंत्रालय, तसेच 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' या उपक्रमांतील सहकार क्षेत्राचे योगदान विषद केले. विविध प्रशिक्षण उपक्रम व उद्योग संधींची माहिती देत सहकार चळवळीचे भविष्य भक्कम असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाला पांडुरंग साखर कारखान्याचे माजी चेअरमन दिनकरभाऊ मोरे, पंढरपूर बँकेचे चेअरमन सतीशराव मुळे, जिल्हा संघचालक डॉ. रमेश सिद, युवक नेते प्रणव परिचारक, करमाळ्याचे कन्हैयालाल देवी, सुरज रोंगे, सहकार भारतीचे भोवाळकर तसेच पंचक्रोशीतील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सह विभाग प्रमुख नाना वाघमोडे, सूत्रसंचालन विशाल तपकीरे तर कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याचे नियोजन गणेश हरिदास यांनी केले.

कार्यक्रम अत्यंत उत्साही व प्रेरणादायी वातावरणात पार पडला असून नूतन कार्यकारिणीस सहकार क्षेत्रात नवचैतन्याने कार्य करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा प्राप्त झाली आहे..!

# भाविकांच्या सेवेत श्री.वटवृक्ष मंदीर समिती न्यासाची वाटचाल लक्षणीय : संपादक उदय तानपाठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : येथील श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता येणाऱ्या भाविकांसाठी वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने देवस्थानच्या मुरलीधर मंदिराच्या ठिकाणी सुसज्ज वातानुकूलित भक्तनिवासाचे बांधकाम तसेच स्वामी भक्तांच्या सुलभ स्वामी दर्शनाकरिता दर्शन रांगेचे बांधकाम हाती घेण्यात आले आहेत. या सर्व बाबी स्वामी भक्तांसाठी सेवाभाव या हेतूने मंदिर समिती नेहमीच प्रयत्नशील राहून विविध उपक्रम राबवत असते. त्या अनुषंगाने नियोजीत मुरलीधर मंदिर येथील दर्शन रांगेच्या माध्यमातून सर्व स्वामीभक्तांना लवकरच स्वामी समर्थांचे सुलभरीत्या दर्शन घेता येईल. यासह देवस्थानचे आध्यात्मिक धार्मिक सामाजिक कार्यातील योगदान लक्षात घेता नागरिकांच्या व भाविकांच्या सेवेसाठी श्री वटवृक्ष मंदिर समिती न्यासाची वाटचाल लक्षणीय असल्याचे मनोगत श्री.अंबिका वृत्तपत्र प्रकाशन समुहाचे मुख्य राजकीय संपादक उदय तानपाठक यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील

श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले.

याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेशइंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमेश इंगळे यांनी संपादक उदय तानपाठक यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी संपादक उदय तानपाठक बोलत होते. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, नगरसेवक नागराज कुंभार, श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, श्रीकांत मलवे, धनराज स्वामी, संजय पवार, गिरीश पवार, प्रवीण देशमुख आदींसह भाविक भक्त उपस्थित होते.



# उपशिक्षणाधिकारी श्री दत्ताप्रसाद जंगम यांचा राष्ट्रीय ओबीसी अधिकारी महासंघाचे वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधि, सुधाकर रणदिवे, ता.१८ धाराशिव जिल्हा परिषदेच्या (प्राथमिक ) उपशिक्षणाधिकारी पदाचा पदभार जेष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी श्री दत्ताप्रसाद जंगम यांनी नुकताच स्विकारला, याबदूल राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ धाराशिव च्या वतीने जिल्हा अध्यक्ष श्री.संतोष भोजने, राज्य उपाध्यक्ष श्री सुखदेव भालेकर,सुनिल चव्हाण, कल्याण बापु बेताळे यांनी केला. सन्माननीय सांगळे साहेब यांच्या सेवानिवृत्ती मुळे सदरील पदाचा पदभार जिल्हा परिषद धाराशिव चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मैनक घोष यांनी श्री जंगम साहेब यांच्या कडे दिला.यावेळी त्यांनी सांगितले की या पदाचा सदुपयोग सर्व सामान्यांच्या विकासासाठी जितका करता येईल तितका करण्याचा प्रयत्न करीन, विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रश्नाला योग्य तो न्याय दिला जाईल असेही त्यांनी सांगितले.

# मागासवर्गीय मुलांनी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागअंतर्गत पंढरपूर व अक्कलकोट मध्ये मागासवर्गीय मुलांसाठी शासकीय वसतिगृहातील प्रवेशासाठी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावरून अर्ज स्वीकारले जात असून, मागासवर्गीय मुलांनी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत

या वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, वातानुकुलीत संगणक कक्ष, सी.सी. टीव्ही कॅमेरा, शुद्ध पिण्याचे पाणी, २४ तास सुरक्षारक्षक इ. सोयी-सुविधा मोफत पुरवल्या जातात. तसेच या वसतिगृहामध्ये शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, खुला, अपंग, अनाथ प्रवर्गनिहाय प्रवेश प्रक्रिया राबविली जाते.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृहातील रिक्त जागेवर इयत्ता आठवी पासून ते उच्च व्यावसायिक शिक्षणाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित वसतीगृहाशी संपर्क साधावा असे आवाहन गृहपाल माळी आर.एम. यांनी केले आहे.

**राज्यपालांच्या उपस्थितीत पालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव** | **९७ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनीचा सत्कार**

# पालिका शाळांनी विद्यार्थ्यांना परकीय भाषा देखील शिकवाव्यात : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लहान मुले तंत्रज्ञानस्नेही असतात तसेच ते नवनवीन भाषा देखील लवकर शिकतात. बृहन्मुंबई महानगर पालिका देशातील आर्थिकदृष्ट्या संपन्न महानगरपालिका असून पालिकेने आपल्या शाळा संपूर्ण देशासाठी पथदर्शक म्हणून विकसित कराव्यात तसेच विद्यार्थ्यांना जर्मन, जपानी यांसारख्या विदेशी भाषा देखील शिकवाव्यात, अशी सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई पब्लिक स्कूलच्या नव्या शैक्षणिक सत्राच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव स्वागत समारंभ राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत संस्थेच्या वरळी मुंबई येथील शैक्षणिक परिसरात झाला, त्यावेळी ते बोलत होते.

मुंबई महानगरपालिका ११०० शाळा चालवीत असून ३.५० लाख विद्यार्थ्यांना संपूर्ण शालेय साहित्य व भोजन मोफत देत असल्याबद्दल पालिकेचे अभिनंदन करताना शाळांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाशिवाय कौशल्य विकास व खेळासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्या, असे राज्यपालांनी सांगितले. मुंबईत खेळांची मैदाने कमी असल्यामुळे शाळांना रोटेशन पद्धतीने मैदाने उपलब्ध करून द्यावीत असे राज्यपालांनी सांगितले.

फिनलँड देशाच्या शिक्षण पद्धतीचे कौतुक केले जाते असे नमूद करून पालिकेने आपल्या काही शिक्षकांना तेथील शिक्षणपद्धती समजून घेण्यासाठी पाठवावे असे राज्यपालांनी सांगितले. गरिबीतुन लोकांना बाहेर काढण्यासाठी शिक्षण ही एकच किल्ली असल्याचे नमूद करून पालिकेतील विद्यार्थ्यांचा दहावीचा निकाल ९३ टक्के लागल्याबद्दल राज्यपालांनी सर्वांचे अभिनंदन केले.

शाळेत पोषण आहार देताना ज्या विद्यार्थ्यांना अंडी खाणे चालत असेल अशा विद्यार्थ्यांना उकडलेली अंडी देण्याबाबत देखील पालिकेने प्रायोगिक तत्वावर सुरुवात करावी, अशी सूचना राज्यपालांनी केली.

यावेळी राज्यपालांनी प्रातिनिधिक स्वरुपात विद्यार्थी व पालकांना शैक्षणिक साहित्य व चॉकोलेट्सचे वाटप केले. राज्यपालांनी वर्गखोल्यांची पाहणी केली तसेच खगोलशास्त्र प्रयोगशाळेला भेट दिली. पालिकेच्या शाळेतून ९७ टक्के गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनीचा राज्यपालांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी अतिरिक्त महानगर पालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी मुंबई महानगरपालिका कन्नड, तमिळ, मराठी, हिंदी, उर्दू आदी आठ माध्यमांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण देत असून राज्य परीक्षा मंडळासह, सीबीएसई, आयसीएसई, आयबी आदी मंडळांचे अभ्यासक्रम उपलब्ध करून देत असल्याचे सांगितले. मुंबई महानगरपालिकेचे शैक्षणिक बजेट ४००० कोटी रुपयांचे असून पालिका विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक साहित्य मोफत देत असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त आणि प्रशासक भूषण गगराणी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, महानगरपालिका उपआयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ, शिक्षक, पालक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जेल रोड




पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ जून रोजी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास भुलाबाई चौक येथे घडली.याप्रकरणी मुशरिफ रफिक शेख (वय-३६,रा.२ नंबर झोपडपट्टी विजापूर नाका) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून तौफिक जावीद बागवान (वय-३२) व महिबूब मकानदार (वय-२६,रा.मित्र नगर,शेळगी) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांचा लहान भाऊ याला शिवीगाळ करत असताना फिर्यादी यांनी तू का शिवीगाळ करत आहे असे विच-ारले.त्यावेळी तौफिक याने त्याच्या हातातील लाकडी काठीने मारून दुखापत केली व तसेच महिबूब याने फिर्यादीस खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ करत दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

# मोबाईल व व्यसनांपासून विद्यार्थ्यांनी दूर राहा : गडाख

## ढोल ताशांच्या गजरात सायखेडा विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :- मराठा विद्या प्रस-ारक समाज संचलित जनता इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सायखेडा येथे नवीन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ नवागतांच्या स्व-ागताने उत्साहात साजरे करण्यात आले . ही आवडते मज मनापासून शाळा ,लाविते लळा जसा माऊली बाळा या उक्तीप्रमाणे नवीन शालेय जीवनात पदार्पण करणारे अर्थात इयत्ता ५ वी त दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात विद्यालयात विद्यार्थ्यांना आणण्यात आले.विद्यार्थ्यांचे औक्षण करून व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शालेय परिपाठ व राज्यगीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक शिवाजी गडाख होते.याप्रसंगी नवीन विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मोबाईल व्यसनांपासून दूर रहा असा संदेश आपल्या मनोगतातून त्यांनी दिला.माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष विजय कारे, उच्च माध्यमिक शालेय समिती अध्यक्ष स्वामी कमलाकांतचार्य महाराज ,व्यवस्थापन समिती अध्यक्ष नितीन गावले,माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष अनिल कातकाडे ,महाविद्यालयाचे प्राचार्य खालकर , मुख्याध्यापक रामदास वाजे पर्यवेक्षक के.आर.आहेर आदी मान्यवर उपस्थित होते.शासनाकडून प्राप्त झालेली पाठ्यपुस्तक विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली याप्रसंगी सुंदर अशी रांगोळी, गेट सजावट, सुंदर फलकलेखन विद्यालयामध्ये करण्यात आले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.

# निवेदक शशिकांत चव्हाण यांना शिवनेरी महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

जनसेवा जनाधार सेवा मंडळ (रजि) जुन्नर, जिल्हा पुणे यांच्यावतीने दरवर्षी आयोजित असलेला शिवनेरी महाराष्ट्र भूषण पुरस्कार सुप्रसिद्ध सूत्रसंचालक व निवेदक शशिकांत चव्हाण यांना जाहीर झाला आहे. दर वर्षी संपन्न होणाऱ्या या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शिवनेरी महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. यावर्षी कलाक्षेत्रात सूत्रसंचालक व निवेदक म्हणून उल्लेखनीय कार्य करणारे व गेले अनेक वर्ष विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व निवेदन करणारे सुप्रसिद्ध सूत्रसंचालक श्री. शशिकांत चव्हाण यांना शिवनेरी महाराष्ट्र भुषण पुरस्कार जाहीर झाला आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दि. २२ जून रोजी करंजाळे, (माळशेज घाट) तालुका जुन्नर जिल्हा पुणे येथे शिवनेरीचे आमदार श्याम दादा सोनवणे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रबोधनात्मक शाहिरी जलसा शाहिरा सीमाताई पाटील या सादर करणार असून शाळेय विद्यार्थी गुणगौरव समारंभ होणार आहे. शशिकांत चव्हाण यांना या पुरस्काराबद्दल विचारले असता रसिक माय बापाचे आशीर्वाद व शुभेच्छा मुळेच ईतपर्यंत पोहचू शकलो त्यांना धन्यवाद देवून हा पुरस्कार नुकताच दिवंगत झालेली माझी आई आनंदीबाई हीला समर्पित करीत असल्याचे भावना त्यानी व्यक्त केली.

# पंढरपुरात भारत विकास परिषदेचा पदग्रहण समारंभ संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारत विकास परिषद ही सेवा भावी संस्थेच्या वतीने दिनांक १४ शनिवार रोजी दायित्व ग्रहण सोहळ्याची शपथविधी के बी पी चौक हॉटेल राजेश येथे करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित अभिनेते रवींद्र मंकणी, सौ सुनेत्रा मंकणी, पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहसचिव गिरीश कुलकर्णी आणि मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना प्रमुख पाहुणे रवींद्र मंकणी मनाली पंढरपूर सारख्या आध्यात्मिक शहरात भारत विकास परीक्षेत आपल्या विविध कार्यक्रमाने समाजसेवेची बरोबरच उच्च दर्जाची संस्कार विद्यार्थ्यांना देत आहे येथे येऊन खूप आनंद झाला नूतन अध्यक्ष सौ रोहिणी कोर्टी कर यांनी निवडीबद्दल ऋण व्यक्त करीत आपण घेतलेली जबाबदारी उत्तम रीतीने पार पाडू अशी ग्वाही त्यांनी दिले व संस्थापक अध्यक्ष डॉक्टर सुरेंद्र काने यांच्या मार्गदर्शनाखाली शपथविधी पदग्रहण सोहळा संपन्न झाला नूतन अध्यक्ष म्हणून सौ रोहिणी कोर्टीकर यांची निवड करण्यात आली असून नूतन सचिव मंदार केसकर सौ अनुराधा हरिदास यांच्या नूतन सेवा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली महिला संघटक पदी सौ भाग्यश्री लिहिणे यांची निवड करण्यात आली अमित शिरगावकर आरडी देशपांडे स्वाती जोशी यांची भारत को जानू स्पर्धा प्रमुख म्हणून निवड करण्यात आली व माधुरी जोशी सौ स्वानंदी गाणे सौ शिल्पा सौंड वार यांची निवड करण्यात आली माझ्या अध्यक्ष पत्रकार मंडळ लोहोकरे यांनी माझ्या अध्यक्ष मनोगत व मागील वर्षी केलेल्या कार्याचा अह-वाल माजी सचिव डॉक्टर अनिल पवार यांनी सादर केला सदस्य म्हणून पत्रकार चैतन्य उत्पाद मनोज कुलकर्णी आहेत वाडकर सुरेखा कुलकर्णी, सुचिता भादुले व जयंती कुलकर्णी, मकरंद रत्नपारखी ,प्रीती वाघ , बारसोडे मॅडम ,अजित भायानी, त्यांची निवड करण्यात आली व सौ सीमा कुलकर्णी यांनी उपस्थित आमचे स्वागत केले व सौ मोनिकाच्या यांनी प्रास्ताविक केले मान्यवर पाहुण्यांचा परिचय यादगिरी मॅडम व सौ माधुरी जो-शी व सौ डॉक्टर वर्षा काने यांनी केला यावेळी पंढरपूर येथील रोटरी क्लब लायन्स क्लब विद्या विकास मंडळ पदाधिकारी कला साधना सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत महाजन बडवे शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उप-स्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर सौ मैत्रिय केसकर यांनी केली.

# नळदुर्ग येथील डॉ. जे. बी. वडणे,जेष्ठ पत्रकार विलास येडगे यांना आम्मा पुरस्काराने करण्यात आले सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

नळदुर्ग येथील कै.यमुनाबाई रंगराव अहंकारी प्रतिष्ठानच्या वतीने नळदुर्गचे माजी नगरसेवक व ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष विनायक अंहकारी यांच्या आयोजित आम्मा पुरस्कार सोहळा मोठ्या प्रमाणात संपन्न करण्यात आला.

माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी आपल्या मातोश्री कै.यमुनाबाई रंगराव अहंकारी यांच्या आठवणी जाग्या आसाव्यात म्हणून आईच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त आईच्या नावाने आम्मा पुरस्कार सुरु करण्यात आलेला आहे.

यावर्षी हा पुरस्कार नळदुर्ग येथील सेवानिवृत्त अतीरिक्त जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ.जे. बी वडणे यांना त्यांच्या वैद्यकीय सेवेचे ५० वर्ष पूर्ण झाले शिवाय नळदुर्ग शहरातील ते ऐकमेव डॉक्टर आहेत ते २४ तास निस्वार्थ सेवा करतात ते गोर गरीब जनतेला उत्तम सेवा देतात म्हणून त्यांना



आम्मा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले शिवाय दुसरे पुरस्काराचे मानकरी नळदुर्ग येथील जेष्ठ पत्रकार विलास रामराव येडगे

**नळदुर्ग येथील कै. यमुनाबाई रंगराव अंहकारी प्रतिष्ठानचा अनोखा उपक्रम**

यांना त्यांच्या पत्रकारिता सेवेला ३५ वर्ष पूर्ण झाले लिखानाचा छंद निर्भिड लेखणी उज्वल भविष्यासाठी तरुणाना मार्गदर्शन नळदुर्ग शहराच्या विकासासाठी विविध प्रकारची निस्वार्थ लेखणी करून विकासात योगदान दिले आहे पत्रकाराच्या विविध मागण्यासाठीअनेक आंदोलने उपोषणे केली नळदुर्ग तालुका निर्मितीसाठी अंदोलने केले जेल ही भोगले पत्रकार विलास येडगे याना इतिहास आहे म्हणून त्यांना आम्मा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष शहबाज काझी, माजी नगरध्यक्ष नितीन कासार, माजी उपनराध्यक्ष शफिभाई शेख, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, माजी नगरसेवक बसवराज धरणे, ब्राह्मण समाज संघटनेचे सचिव मुकुंद नाईक, सामाजिक कार्यकर्ते अझहर जगीरदार, शिवसेनेचे सरदारसिंह ठाकूर, भाजपाचे माजी अध्यक्ष धिमाजी घुगे,पद्माकर घोडके,सोसायटीचे संचालक रघ-ुनाथ नागणे,आंबाबाई देवस्थ-ानचे अध्यक्ष रमेश जाधव, युवा उद्योजक समीर मोरे..जेष्ठ नागरिक बाळासाहेब कुलकर्णी, वसंतराव अहंकारी, बाबुराव वैद्य, अशोकराव केसकर, वसंतराव रामदासी, उत्तमराव रामदासी, सुधीर पुराणिक, मुकुंद भूमकर, तानाजी नागणे,पत्रकार उत्तम बनसगोळे, पत्रकार तानाजी जाधव, पत्रकार दादासाहेब बनसोडे, राजेंद्र महाबोले, सतीश जाधव, अमर भाळे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्यासोबत सचिन भूमकर,ज्ञानेश्वर केसकर,अजय देशपांडे,दिशा ब्यांकेचे व्यवस्थापक उमेश जाधव, प्रदीप ग्रामोपाध्याय,सन्नी भूमकर, उमेश नाईक,संतोष नाईक,सदानंद नाईक,हालीम पटेल,बंडाप्पा कसेकर. सौरभ रामदासी,प्रसन्ना कुलकर्णी,गणेश मोरडे, सुनिल गव्हाणे,अनिल पाटील, महेश कोप्पा,सुनिल गव्हाणे, विजय ठाकूर रोहित वाले.यांनी यांनी प्रयत्न केले.. मान्यवरांच्या हस्ते आम्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी तानाजी जाधव,मुकुंद नाईक, कमलाकर चव्हाण, शहबाज काझी, शफिभाई शेख, डॉ. वडणे यांनी आपल्या मनोगतातून विनायक अहंकारी यांच्या कार्याचे कौतुक केले.शेवटी विनायक अहंकारी यांनी सर्वांचे आभार मानले .

**महाराष्ट्र शासनाचा आर आर (आबा) पाटील तालुका सुंदर गाव पुरस्कार**

# आदर्श सरपंच सन्मान सोहळ्यात आदर्श ग्रामपंचायत म्हणून डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांस महाराष्ट्र शासनाचा आर आर (आबा) पाटील तालुका सुंदर गाव पूरस्कार १० लाख रुपयांची उपमुख्यमंत्री एकनाजी शिंदे, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री ठाणे जिल्हा यांच्या हस्ते प्राप्त झाला असुन, ४० लाख रकमेचा जिल्हा सुंदर गाव पुरस्कार घोषित झाले आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत ग्रामपंचायत मध्ये अतिशय चांगले काम केले असुन,त्यात पुरस्कार मिळण्यासाठी अतिशय चांगले प्रयत्न ग्रामपंचायत मार्फत करण्यात आले आहे. तसेच संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत नुकताच जिल्हा स्तरीय पुरस्कारासाठी जिल्हास्तरीय टिम ग्रामपंचायत पाहणी करून गेली आहे.तो पुरस्कार देखील




ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे यांना मिळण्याची आशा आहे. ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे ही ५ गावांची मिळून बनली असुन. सदर गावात मूलभूत सुविधेची विकासकामे अंत्यत चांगल्या पद्धतीने झाली असुन.गावाची वाटचाल अतिशय चांगल्या सकारात्मक विचारानी सुरु आहे. डोहोळे ग्रामपंचायत मध्ये भेट दिल्यास तिथला परिसर अतिशय प्रसन्न असुन सदर परिसरात स्वतः सरपंच उपसरपंच ग्राम पंचायत कमिटी व ग्रामपंचायत अधिकारी कर्मचारी यांनी लक्ष देऊन इ चार्जिंग स्टेशन, बायोगॅस प्रकल्प, गांडूळखत,सी सी टी व्ही,कचऱ्याचा पुनःवापर पासून प्रयोग केलेल्या वस्तू, वॉल पेंटिंग करून जनजागृती यासारखे प्रकल्प केले असुन तेथेच शेवगा लागवड, खस लागवड करून, ग्रामपंचायत ने छोटीसी रोपवाटिका देखील उभारली आहे. ग्रामपंचायत आवारातच इतके प्रोजेक्ट असणारी डोहोळे ही एकमेव ग्रामपंचायत असेल.

ग्रामपंचायत सोबत चर्चा केली असता गावात आपल्याला जेजे करायची इच्छा आहे त्याची सुरुवात स्वतःपासून केली तर त्याचा असर ग्रामस्थांवर जास्त होईल अस करून नक्कीच सकारात्मक दृष्टीकोन ठेवून गावचा विकास अजुन जलदगतीने होईल असा विश्वास ग्रामपंचायतीला आहे. तसेच भविष्यात गावात जास्तीत जास्त अपारंपारीक ऊर्जास्रोत वापरून विजेचा होणारा अपव्यय टाळला जाईल तसेच कचऱ्याच व्यवस्थित नियोजन करण्याचे,तसेच जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा ग्रामपंचायतीचा मानस आहे. तसेच खालील प्रमाणे कामे ग्रामपंचायत मार्फत झाली आहेत.१.प्रधानमंत्री आवास घरकुल योजने अंतर्गत १५० पी एम जनमन घरकुल योजने अंतर्गत एकूण ७४ कुटुंबाना घरकुलाचा लाभ देण्यात आला.

२.८ मार्च जागतिक महिला दिना निमित्त महिलांचा मेळावा आयोजित करण्यात आला त्यात महिलांना रोजगार विषयक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच इ वेहिकल वापर,ओला सुका कचरा वर्गीकरण,पाणी शुद्धीकरण, इ कचरा संकलन अशा विविध विषया बाबत मार्गदर्शन करण्यात आले व महिलांना कचराकुंडी, कापडी पिशवी तसेच शेवगा रोपे वाटप करण्यात आली.

३. ग्रामपंचायत हद्दीतील गोडाऊन विकास पाहता गावातील युवकांना,महिलांना गांवातच रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. ४.दिव्यांगाना ५% दिव्यांग निधी अंतर्गत १००% अनुदान वाटप करण्यात आले. ५.ऑनलाईन दाखले व सेवा आपले सरकार केंद्रामार्फत ग्राम पंचायत मार्फत देण्यात येतात.

तर ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने विविध उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपली आहे.तसेच ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे हे आल्यानंतरच ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथील कायापालट होत असल्या बाबत ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडून सांगण्यात येत आहे.



# ग्रामपंचायतीच्या वतीने जिल्हा परिषद शाळेतील बालकांना लेखन साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी ग्राम पंचायत कार्यालय मार्फत शाळे-तील पहिलीच्या वर्गास वर्षभर लागणारे लेखन साहित्य वाटप केले जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कन्हेरवाडी शाळेत प्रवेशोत्सव घेण्यात आला.इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसह गावात प्रवेश दिंडी काढण्यात आली. शाळेच्या प्रवेशद्वारात रांगोळी काढण्यात आली होती परिसर फुग्यांनी सजवला होता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले तसेच पाठ्यपुस्तके व ग्रामपंचायतीने दिलेले लेखन साहित्य याचे वितरण सरपंच ड.रामराजे जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कपिल कवडे, उपाध्यक्ष विजयकुमार कवडे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य उमेश शिंदे,संजय सावंत,प्रदिप खंडागळे,अनंत जगताप व मुख्याध्यापक भंडारे बी.एन.यांच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी शाळेच्या आदर्श शिक्षिका श्रीम.आशा कंगळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दीपक चाळक यांनी तर कार्यक्रमाचे आभार नारायण झोरी यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळे-तील शिक्षक वीरभद्र काटकर, राजेश काळे, परमेश्वर वाघमोडे, श्रीम.मंगल गाढवे,आशा कंगळे, सुषमा हंडीबाग यांनी परिश्रम घेतले शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील ९५% विद्यार्थी उप-स्थित होते अतिशय उत्साहात पहिला दिवस साजरा करण्यात आला यावेळी पालकवर्ग आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.